दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक ४६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१७ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

श्रीवर्धन तालुक्यात एसटीला अपघात ; प्रवाशी जखमी

दै.रायगड नगरी । दिघी

श्रीवर्धन तालुक्यातील साखरोणे येथे ब्रेक फेल झाल्याने एसटी ला अपघात झाल्याची घटना सोमवार दिनांक १६ रोजी घडली. उतार उतरताना अचानक ब्रेक फेल झाल्याने एसटी पलटी होऊन अपघातात प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील साखरोने फाट्यावर श्रीवर्धनकडे येताना उतारावर ब्रेक फेल झाल्याने रस्त्यावर पलटी होऊन एसटीचा अपघात झाला. या वेळी चालकाने दाखविलेल्या प्रसंगावधाने मोठी दुर्घटना टळली. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी धाव घेत बचावकार्य सुरू केले. एकूण गाडीत २० प्रवाशी होते. यातील १५ प्रवाशांना किरकोळ मार लागला आहे. जखमींना तत्काळ श्रीवर्धन येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

श्रीवर्धन ते कोलमांडलासाठी सकाळी ९ वाजून १५ मिनिटांनी सुटणारी व परत १० वाजून १५ मिनिटांनी कोलमांडला ते धारवली मार्गे श्रीवर्धन येथे येणारी एसटी चे चालक महादेव पंढरीनाथ खंडागळे व वाहक नवनाथ जायभाये हे होते.

सकाळी कोलमांडला येथून प्रवाशांना घेऊन ही एसटी निघाली असताना साखरोने फाट्याच्या तीव्र उतारावर एसटीचा ब्रेक फेल झाल्याचे चालकाच्या लक्षात आल्यावर प्रसंगावधान राखून चालकाने पुढील तीव्र उताराचे वळण न मारता बस थांबवण्याचा प्रयत्न करत असताना एसटी पलटी झाली असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. त्यामुळे पुढील अपघात टळून प्रवाशांना थोडक्यात झटका बसल्याने यातील १५ प्रवाशांना किरकोळ मार लागला आहे. या एसटी अपघाताची घटना १० वाजून ४५ मिनिटांनी घडली आहे. यातील सर्व प्रवाशी सुखरूप बचावले, अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती. यावेळी श्रीवर्धन पोलिस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थांनी घटनास्थळी भेट देऊन मदत करण्याचे काम केले तर आरोग्य विभागाची रुग्णवाहिका अपघात ठिकाणी तात्काळ पुरविण्यात आली.

मागील संपात अनेक दिवस गाड्या बंद आहेत. ग्रामीण भागातील फेरा करणाऱ्या एसटी ची अवस्था सद्या बिकट आहे. त्यामध्ये रस्ते खराब असल्याने या भागासाठीही खराब झालेल्या तसेच आयुष्यमान संपत चाललेल्या गाड्या वापरल्या जात आहेत. रस्ता खराब तर आहेच शिवाय दुसरी पर्यायी व्यवस्थाही महामंडळाकडे नाही.

या गाड्यांच्या खिडक्यांना काचा नसतात. इंडिकेटरही खराब असतात. बऱ्याच गाड्या तर चावीविनाच सुरू होतात. रस्ता खराब असल्याने तर या बसगाड्यांची अधिकच दुर्दशा झाली आहे. या खराब गाड्यांतून प्रवास करणे मात्र प्रवाशांसाठी धोकादायक ठरत आहे.

५० वर्षांनंतरही पनवेलची मिरची गल्ली जैसे थे...

मिरची गल्लीचा विकास करण्याची स्थनिकांची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल शहरातील मिरची गल्लीची ओळख गेली ५० वर्षा आधी देखील मिरची विक्री व्यवसायाच्या नावाने प्रसिद्ध होती व आजही या परीसराला मिरची गल्ली नावानेच पंचक्रोशीत ओळख आहे पनवेलच्या आजुबाजुला असलेल्या ग्रामीण भागातुन येथे मोठ्या प्रमाणावर मिरचीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर होत असल्याने मिरची गल्ली हे नाव पडल्याचे बोलले जात आहे.

पनवेल शहरातील मीडलक्लास हौसींग सोसायटी, मिरची गल्ली नंतर काही वर्षांपूर्वी वसलेले साई नगर या परीसरात रस्त्याचे कॉंक्रीटीकरण युध्दपातळीवर होत आहे परंतु पनवेलची शेकडो वर्षे जुनी मिरची गल्ली ही मोठी मीरचीची बाजारपेठ अनेक वर्षे उपेक्षीत का ?असा सवाल नागरीकांतुन विचारला जात आहे.

या परीसरातील चंचुमय गटारे, मोडकळीस आलेल्या शंभर वर्षे जुन्या धोकादायक इमारती, महावितरणाचे भंगार लाईटचे पोल त्यावर लटकलेले गंजलेली विद्युत वायरची जाळी आजही शेकडो वर्षे त्याच स्थीतित असल्याने या परीसराला आजही दुर्लक्षीत ठेवण्यात आल्याने येथील नागरीकांत आश्चर्य व्यक्त केले जात आहे सदर परीसरात गल्लीत एखादी मोठी दुर्घटना घडल्यास आत प्रवेश करण्यास अग्नीशमन वाहने नेणे कीती जीकरीचे होईल याचा विचार शासकीय अधिकारी व राज्यकर्ते यांनी का बरे आजमितीला केला नाही असाही सवाल या परीसरात नुकताच लागलेल्या भयानक आगी वेळी उपस्थित नागरीक घटना स्थळी बोलत होते. या मिरची गल्लीत काही दुकानात फटाक्याची विक्रीही पुर्वापार अनेक वर्षे होत आहे तसेच मिरची गल्लीत काही व्यावसायिकांकडे आयुर्वेदातील प्रख्यात औषधांची विक्री केली जाते त्यात कडु कीरायत, पीत्तपापडा,धमासा,दात मजबुती करीता कडुलींबाच्या काड्याही विश्वासाने ग्राहकवर्गात प्रख्यात असल्याने पुर्वापार विकत घेण्याकरीता येत असतात.

त्यामुळेच आता तरी या प्रख्यात मिरची गल्ली बाजारपेठचा विकास होईल का व येथील रस्ते मोठे होऊन वाहतुक कोंडीचा प्रश्न मार्गी लागेल का ?असा सवाल नागरीकांतुन विचारला जात आहे.

संक्षिप्त...

अंदमानात पावसाला सुरुवात, राज्यातही ढग दाटले

दै.रायगड नगरी । मुंबई

सगळ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. कारण, आज अंदमानात मान्सून दाखल झाला आहे. हवामान खात्याकडून यासंबंधी माहिती देण्यात आली आहे. आज सकाळपासून मान्सूनने अंदमानात हजेरी लावली असून अनेक भागांमध्ये ढग दाटून आले आहे. अंदमानात आज तर केरळमध्ये १ जूनला मान्सून दाखल होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे.

अधिक माहितीनुसार, पुढील ५ दिवस अंदमान आणि केरळमधील नजिकच्या शहरांमध्ये मुसळधार पाऊस होईल.

केरळसह दक्षिण भारतातील काही राज्यांना पावसाने झोडपून काढलेलं असताना महाराष्ट्रातीलही नऊ जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसंच मोसमी पावसाची प्रगती वेगाने होत असल्याने हा पाऊस अंदमान आणि निकोबार बेटांवर धडकला आहे.

हवामान खात्याकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, दक्षिणेकडील द्वीपकल्प आणि केतल्सच्या किनार्यावर, अरबी समुद्र आणि बेटांच्या क्षेत्रांवर ढगाळ वातावरण आहे. इतकंच नाहीतर मराठवाड्यातील विदर्भाच्या काही भागांतही ढगांचे वातावरण आहे. राज्यात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागात पूर्वमोसमी पाऊस हजेरी लावेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे.

या पार्श्वभूमीवर कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, परभणी, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. अनेक राज्यांमध्ये पूर्वमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावली असून केरळसह मेघालय, आसाम आणि पश्चिम बंगालमध्येही मुसळधार पाऊस सुरू आहे. दुसरीकडे, उत्तर भारतात मात्र उष्णतेची लाट कायम असल्याचं चित्र आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ कोरोना संकटकाळातील अतुलनीय कार्याबद्दल सन्मानित

दै.रायगड नगरी । पनवेल

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आणि सेवाभावी कार्यात अग्रगण्य असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने कोरोना वैश्विक महामारीच्या संकटकाळात शहरी व ग्रामीण भागातील तळागाळात मदतीचा हात देऊन लाखो नागरिकांना संरक्षित केले आहे. त्याबद्दल पनवेल महापालिकेच्या वतीने कृतज्ञता सन्मान पुरस्कार देऊन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा आज सोहळ्यात गौरव करण्यात आला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित स्पर्धा, टाकाऊ पासून टिकाऊ स्पर्धा आणि स्वच्छ भारत अभियान २०२२, तसेच स्वच्छता दूत गौरव समारंभ पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवारी (दि. १६) पार पडला. आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते या सन्मानाचा स्वीकार मंडळाचे सचिव व सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केला. सन्मानचिन्ह आणि कृतज्ञता सन्मान प्रमाणपत्र असे या सन्मानाचे स्वरूप आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर सीता पाटील, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, सभागृहनेते परेश ठाकूर, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

कोरोना महामारीमुळे संपूर्ण जगावर मोठे संकट कोसळले. नोकरी धंदा व्यवसायावर संक्रात आली. या महामारीने जीव वाचवताना सर्वसामान्यांना पोटाच्या खळगीचा प्रश्न निर्माण झाला. अशा या भूतो न भविष्यतो संकटकालीन परिस्थितीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सचिव परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लाखो जणांना मदतीचा हात दिला. श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळाच्या माध्यमातून एक लाखाहून अधिक अन्नधान्याचे किट, कम्युनिटी किचनच्या माध्यमातून ०१ लाख ५० हजार व्यक्तींना अन्नछत्र, गावाला जाण्यासाठी मदत, रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रक्तदान शिबिरांचे आयोजन, स्वछता मोहिम, आर्थिक मदत, याखेरीज ०१ लाख अर्सेनिक अल्बम गोळ्या, सॅनिटायझर, ०१ लाख १० हजार मास्कचे वाटप, कोरोना काळातील गणपती सण गोड करण्यासाठी ६० हजार जणांना

◄ .../२

अभिनेत्री केतकी चितळे हिच्या कळंबोली येथील घराची पोलिसांनी घेतली झाडाझडती

दै.रायगड नगरी । पनवेल

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याबद्दलची आक्षेपार्ह पोस्ट अभिनेत्री केतकी चितळेला महागात पडली आहे. केतकीला १८ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलीस केतकीच्या पोस्टचा तपास करत आहेत. ठाणे पोलीस आज केतकी चितळेला घेऊन तिच्या कळंबोली येथील नातेवाईकांच्या असलेल्या घराकडे रवाना झाले. केतकीच्या घरातून लॅपटॉप आणि इतर कागदपत्र घेण्यासाठी पोलिसांची टीम रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, शरद पवारांवर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी केतकी चितळेला अटक करण्यात आली आहे. केतकीविरुद्ध कळवा पोलिस ठाण्यात कलम ५००, ५०५(२), ५०१ आणि १५३ – अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. राष्ट्रवादीचे पदाधिकारी स्वप्निल नेटके यांनी हा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान ती नातेवाईकांकडे गेल्या काही महिन्यांपासून राहत असलेल्या कळंबोली सेक्टर १६ येथील एव्हलॉन सोसायटीमधील पहिल्या मजल्यावर ती राहत होती. या ठिकाणावरुनच तीने या पोस्ट केल्याचा अंदाज पोलिसांना असून त्या दृष्टीने त्यांनी ती वापरत असलेला मोबाईल फोन, लॅपटॉप व इतर कागदपत्रे ताब्यात घेण्यासाठी तेथे आले होते. यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ठाणे, नवी मुंबई तसेच सायबर सेलची पथके यावेळी उपस्थित होते.

विहूर व चिकणी पुलाच्या रस्त्याच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम नाही

पुन्हा रस्ता वाहून जाण्याची शक्यता ; बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

दै.रायगड नगरी । मुरुड

मुरुड मुंबई रस्त्यावर असणारा विहूर पुलाच्या रस्त्यांचा भाग हा २७ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे वाहून गेला होता. या पुलास असणारी दगडी संरक्षक भिंत मातीसह वाहून गेल्याने त्यावेळी सदरच्या पुलावरून काही दिवस वाहतूक सुद्धा बंद ठेवण्यात आली होती. अत्यंत महत्वाचा वाहतुकीसाठी असणारा हा पुल असताना सुद्धा मुरुड सार्वजनिक बांधकाम खात्याने अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करून आपली जबाबदारी इटकण्याचे काम केले आहे. सदरील पुलाची माती व दगड टिकून राहण्यासाठी सिमेंट कॉंक्रीटचे संरक्षक भिंत आवश्यक असताना सुद्धा केवळ मातीचा भराव टाकून हे काम आटोपते घेतले आहे. पावसाळा जवळ आला तरी बांधकाम खात्याचे दुर्लक्ष पुन्हा हा रस्ता वाहून जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या सरक्षक भिंतीला दगड सुद्धा लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पुढील पावसात ही माती वाहून जावून पुन्हा तोच प्रश्न येरणीवर येणार आहे. फक्त मातीचा भराव टाकून सार्वजनिक बांधकाम खात्याने आपली जबाबदारी इटकुन टाकल्याने आता या पुलाचे काम होणार तरी कधी हा येथे प्रश्न निर्माण झाला आहे. मुरुड

हे पर्यटन स्थळ असल्याने येथे हजारोच्या संख्येने गाड्यांची वाहतूक सुरू असते तरी सुधा या पुलाच्या संरक्षक भीतीला फक्त माती भराव कितपत टिकाव धरणार याचा सवाल समस्त

◄ .../२

शेतकऱ्यांनी कोकण विकासाचे शिल्पकार व्हावे : आ.दिपक केसरकर

दै.रायगड नगरी । दापोली

शेतकऱ्यांनी डॉ . बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या नवतंत्रज्ञानाच्या वापराने कोकण भूमी समृध्द करुन कोकण विकासाचे शिल्पकार व्हावे, असे आवाहन राज्याचे माजी अर्थ , ग्रामीण विकास मंत्री व सावंतवाडीचे आमदार दीपक केसरकर यांनी येथे केले . कृषि विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. संजय सावंत होते.

व्यासपीठावर विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ . संजय भावे, कार्यकारी परिषद सदस्य विनायक काशिद , प्रगतशील शेतकरी हेमंत भांडारकर व पालवी महोत्सवाचे समन्वयक डॉ. प्रमोद सावंत उपस्थित होते. केसरकर पुढे म्हणाले की , कोकण नजरेसमोर ठेवून ' शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे ' व ' विकेल ते पिकेल ' या दोन्ही संकल्पना एकत्रितरीत्या पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने ' सिंधूरत्न ' योजना कार्यान्वित करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यायला हवा . शेतकऱ्यांनी अन्नधान्य व फळपिकांचे मूल्यवर्धन केल्यास ते आर्थिकदृष्ट्या सबळ होतील , असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भात लागवडीच्या

◄ .../२

आव्हान सूर्याच्या प्रकोपाचे

एके काळी उत्तम हवामानासाठी प्रसिद्ध असलेल्या पुण्यात सूर्य आग ओकण्याचे आणि पारा ४२ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याचे दिवस वाढलेले असताना, हवामान बदलाबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या आंतरशासकीय समितीचा (आयपीसीसी) देशातील शहरांबाबतचा अहवाल चिंता वाढविणारा आहे. या शतकाच्या अखेरपर्यंत मुंबई आणि पुणे या महानगरांतील तापमान पाच अंश सेल्सिअसने वाढणार असून, कमाल तापमान ४५.४ अंश सेल्सिअसवर जाण्याची भीती त्यात व्यक्त करण्यात आली आहे. दिल्ली, लखनौ, पाटणा, जयपूर, कोलकाता यांसह अनेक शहरांतील स्थितीही अशीच असणार आहे. गेली काही वर्षे सातत्याने उन्हाळा तीव्र होत असल्याचे आपण सारे अनुभवत आहोत. विदर्भ, मराठवाडा या भागांत; तसेच सोलापूर आदी शहरांत उन्हाळ्यात कमाल तापमान ४२-४३ अंश सेल्सिअसच्या घरात असते. आता राज्यातील सर्वच शहरांत आणि देशाच्या बहुतेक भागांत हीच परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर 'आयपीसीसी'च्या अहवालाकडे गांभीर्याने पाहायला हवे. तापमानातील वाढीला आणि एकूणच हवामानातील बदलाला कारणीभूत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी सरकारी पातळीवरूनच नव्हे, तर वैयक्तिक स्तरावरही उपाययोजना आखून, अमलात आणायला हव्यात. तसे होताना दिसत नाहीच; परंतु तापमानवाढीची समस्या भीषण रूप धारण करेल याची चिंताही कोणाला भेडसावताना दिसत नाही. त्यामुळे 'आयपीसीसी'च्या अहवालातील इशाऱ्याकडे दुर्लक्ष होण्याचीच शक्यता आहे. वैश्विक तापमानवाढ आणि हवामान बदल हा विषय गेल्या दोन वर्षांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिला जात असला, तरी धोरणकर्त्यांपासून सर्वसामान्यांपर्यंत सर्वच जण तो पुरेशा गांभीर्याने घेताना दिसत नाहीत. इंधनाचा बेसुमार वापर करून भौतिक सुखसोयी निर्माण करण्याचे विकासाचे प्रारूप मोठ्या प्रमाणावर प्रदूषण निर्माण करीत आहे. इंधनाच्या ज्वलनातून उत्सर्जित होणाऱ्या कार्बनादी वायूंमुळे पृथ्वीचा पृष्ठभाग तापत आहे; त्यामुळे हवामानाचा लहरीपणा वाढेल आणि त्याचा फटका सर्वांना बसेल, असा इशारा शास्त्रज्ञ सातत्याने देत आहेत. 'आयपीसीसी'चे अहवाल आणि हवामानविषयक आंतरराष्ट्रीय परिषदांतून याबाबतची चिंता जाहीरपणे व्यक्त होते; परंतु या परिषदांत तापमानवाढ रोखण्यासाठी कृतिशील सर्वसहमतीऐवजी आरोप-प्रत्यारोपांच्या फेऱ्या झडताना दिसतात. कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर सहमती होत असली, तरी त्यासाठी कायदेशीर कटिबद्धता स्वीकारताना मात्र प्रदूषणकारी बडे देश मागे हटताना दिसतात. कार्बन उत्सर्जनाची पातळी कमी करण्यासाठी प्रदूषण न करणाऱ्या तंत्रज्ञानाचे विकसन आणि त्याचे हस्तांतरण महत्त्वाचे आहे. त्याबाबत प्रदूषणकारी देश पुरेसे उत्सुक नाहीत. विकासाचे सध्याचे प्रारूप आणि पर्यावरण यांमध्ये समतोल साधणारे धोरण अवलंबण्याखेरीज प्रदूषण कमी करता येणार नाही. या दृष्टिकोनातून भारतात सरकारी पातळीवर चर्चा होत असली आणि उत्सर्जनाची पातळी खाली आणण्याबद्दल स्वीकारार्हता दाखविली गेली असली, तरी याबाबतचा आग्रह दिसत नाही. मोठा भूगोल आणि लोकसंख्या यांमुळे भारताचे कर्बोत्सर्जन अधिक असले, तरी तो विकसनशील देश असल्याने इंधनाची गरज वाढतच जाणार आहे; पण विकासाची अपरिहार्यता सांगत तापमानवाढीला फारसे महत्त्व न देण्याची मानसिकता दिसते. विकासाच्या पारंपरिक पद्धतीचे दुष्परिणाम हवामान बदलाच्या रूपाने दिसत आहेत. पन्नासच्या दशकात वर्षभरातील उष्ण दिवसांची संख्या चाळीसच्या घरात होती, ती आता शंभरावर गेली आहे. थोडक्यात, उन्हाळा असह्य होतो आहे. हिवाळ्यात थंडीची लाट येण्याचे प्रकार वाढत आहेत, पावसाळ्यात देशाच्या काही भागांत वारंवार अतिवृष्टी होत असून, महापुराने शहरे पाण्याखाली जाण्याचे प्रसंग आणि चक्रीवादळांनी तडाखा देण्याचे प्रमाणही वाढले आहे. हवामानातील हे टोकाचे बदल वाढत जातील, असाच इशारा 'आयपीसीसी' अहवालाने दिला आहे. त्याकडे आता दुर्लक्ष करून चालणार नाही. हवामानातील बदलांचा सर्वाधिक फटका शहरांतील गरीब, श्रमिक यांबरोबरच महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक यांना बसणार आहे. त्यांना आणि मुख्य म्हणजे आपली शहरे वाचविण्यासाठी उपाय करणे भाग आहे. वैश्विक विचार आणि स्थानिक कृती या उक्तीनुसार नागरिकांनीही उपायांसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. कार्बन उत्सर्जनाची पातळी घटविण्यासाठी प्रदूषण कमी करायला हवे. त्यासाठी अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढविणे, सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे आणि मुख्य म्हणजे शहरांतील हरित अच्छादन वाढविणे आवश्यक आहे. सोसायट्यांनी अपारंपरिक ऊर्जेसाठी पुढाकार घ्यायला हवा. आपला परिसर हिरवा राहावा, यासाठीही काळजी घ्यायला हवी. महानगरांमधील मोकळ्या जागा, मैदाने, बागा कमी होत आहेत. त्या वाढतील यासाठी नियोजन करायला हवे. नद्यांमधील अतिक्रमण थोपवायला हवे. नद्या-नाल्यांना नैसर्गिक प्रवाहांनुसार वाहू द्यावे. अशा उपायांद्वारे तापमानवाढ रोखता येऊ शकेल. आताच हे न केल्यास पुढील पिढ्या आपल्याला क्षमा करणार नाहीत.

आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवस निमित्त म्हसळा ग्रामीण रुग्णालय येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

दै.रायगड नगरी । म्हसळा

पद्मश्री डॉक्टर आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवस निमित्त म्हसळा ग्रामीण रुग्णालय येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या विद्यमानाने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. शआप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ. सचिनदादा धर्माधिकारी, उमेशदादा धर्माधिकारी, राहुलदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरासाठी तालुक्यातील ११० सदस्यांनी रक्तदान केले रक्तदान हे सर्वात श्रेष्ठदान हे संकल्प उभे करत डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी हा उपक्रम हाती घेता आहे.

सकाळी १० वाजल्यापासून दुपारी २ वाजेपर्यंत रक्तदानाचे कार्य सुरु होते. यावेळी रक्तदान ठिकाणी म्हसळा पोलिस निरीक्षक उद्धव सुर्वे माणगाव पंचायत समिती सभापती सुजित शिंदे पत्रकार उदय कळस, प्रतिष्ठत व्यकी सुरेश कुडेकर, महादेव पाटील मान्यवर उपस्थित होते. रक्तदान संकलनासाठी सामान्य जिल्हा रुग्णालय अलिबाग रायगड रक्तपेढी उपस्थित होती. त्यांचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. दिपक गोसावी, रक्तपेढी तंत्रज्ञ हेमकांत सोनार, रक्तपेढी तंत्रज्ञ सुनील बंदीछोडे, अधिपरिचालक आकाश सावंत, अधिपरीचालक प्रशांत तुरुरे, प्रयोग शाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, रक्तपेढी परिचय उमेश पाटील, महेश घाडगे कर्मचारी तसेच म्हसळा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. ढवळे, म्हसळा ग्रामीण रुग्णालय वैदयकीयअधिकारी डॉ. महेश मेहता त्यांचे सर्व कर्मचारी अधिकारी यांनी विशेष सहकार्य केले. तसेच म्हसळा तालुक्यात या प्रतिष्ठानने दोन पाणपोई, अनेक गावांमध्ये बस थांबे, पाझर तलावातील गाळ उपसा,रस्त्याच्या दुतर्फा भागात वृक्षरोपण, २५००पेक्षा विविध जाती धर्माचे जातीचे दाखले वाटप, ग्रामीण भागासह शहरात स्वच्छता मोहीम, तसेच ५०४ वय अधिवास, जेष्ठ नागरिक दाखले वाटप केले असे वेळोवेळी समाजपयोगी उपक्रम करत समाजाला एक नवीन दिशा देण्याचे काम प्रतिष्ठान वेळोवेळी करत आहे.

जेएनपीएची नैसर्गिक जलकुंभ,पाणवठे, तलावांच्या सुशोभित व पुनरुज्जीवित करण्याची योजना

साडेतेरा कोटीच्या खर्चाच्या योजनेमुळे ब्युटीस्पॉट आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार

दै.रायगड नगरी । उरण

जेएनपीएने बंदर परिसरातील नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे, व तलावांतील गाळ काढून पुनरुज्जीवित करुन ते सुशोभित करण्याची योजना आखली आहे.जेएनपीए व प्रशासन भवन परिसरात कामानिमित्ताने दररोज येणाऱ्या देशी-विदेशी प्रवासी, वाटसरू, नागरिकांसाठी हे ब्युटी स्पॉट आकर्षण ठरणार आहेत. सुमारे साडेतेरा कोटीच्या खर्चाच्या योजनेच्या कामाला जेएनपीएने सुरुवातही केली आहे.

त्यामुळे हे पाचही ब्युटीस्पॉट मे २०२३ पर्यंत पुर्णत्वास जाणार असुन जेएनपीए परिसराच्या सौंदर्यात आणखीनच भर घालण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत.अशी माहिती जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी दिली आहे. जेएनपीटी बंदराची २६ मे १९८६ निर्मिती झाली.

त्याआधी पासुन या परिसरात जीवंत पाण्याचे झरे असलेले पाणवठे व तलाव आहेत.नैसर्गिकरित्या निर्माण झालेले पाणवठे व तलाव पावसाळा सुरू होईपर्यंत पाण्याने भरलेले असतात.मात्र पाण्याच्या ओलाव्यामुळे या पाणवठे व तलाव परिसरात विविध प्रकारच्या विषारी वनस्पतींच्या वाढीमुळे पाणी आणि वातावरणही दूषित होते.यासाठी बंदर क्षेत्रातील विविध नैसर्गिक निर्मित हरित प्रकल्पांना प्रोत्साहन, पुनरुज्जीवित करण्याच्या सूचना बंदर क्षेत्रातील हरित बंदर, शिपिंग आणि जलमार्ग मंत्रालयाने जेएनपीए प्रशासनाला दिल्या आहेत.

ग्रीन पोर्ट उपक्रमाच्या दृष्टीने सध्याच्या प्रस्तावावर विचार करण्यात आल्यानंतर प्रशासन भवनाच्या खालच्या बाजूला तसेच जुने शेवा गावच्या पायथ्याशी असलेले, शिव मंदिराजवळ आणि सीसीपी प्लाझा शेजारी असलेल्या पाच नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे,तलावांचे सुशोभीकरण करण्याची योजना आखण्यात आली आहे.या योजनेसाठी १३ कोटी ११ लाख ७० हजार ६२५ रुपये खर्च अपेक्षित आहे. निधीच्या तरतुदीनंतर जेएनपीएने या योजनेच्या कामाला सुरुवातही केली आहे.१८ महिन्याच्या मुदतीचे काम मे २०२३ अखेर पुर्णत्वास जाणार असल्याचे जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी सांगितले. नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे, व तलावांतील गाळ काढून पुनरुज्जीवित झाल्यानंतर अभ्यागत, स्थानिक तसेच तेथील रहिवाशांसाठी सौंदर्यदृष्ट्या डिझाइन केलेली जागा ब्युटीस्पॉट जेएनपीए व प्रशासन भवन परिसरात कामानिमित्ताने दररोज येणाऱ्या देशी-विदेशी प्रवासी, वाटसरू, नागरिकांनाच नव्हे तर येथील रहिवाशांनाही एक आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.त्याशिवाय नैसर्गिक वैशिष्ट्यांवर आधारित असलेल्या आणि जलस्रोतांवर अवलंबून असलेल्या पक्षी, फुलपाखरे, वनस्पती, जीवजंतू यासारख्या या क्षेत्राच्या समृद्ध जैवविविधतेच्या अनेक घटकांच्या मुक्त हालचाली,संचाराला या जलस्रोतांच्या पुनरुज्जीवनाचा फायदा होणार आहे. तसेच सुशोभीकरण पर्यटकांसाठीही आकर्षण ठरणार आहे.

या प्रकल्पामुळे हा परिसर वनस्पती आणि जीवजंतूंच्या निरोगी वाढीसह एक चांगले ठिकाण बनणार आहे. तसेच जैवविविधता वाढीलाही हातभार लागणार आहे.तसेच येथील रहिवासी पर्यटकांसाठी एक चांगले पर्यावरणीय स्थळ उदयास येईल असा विश्वासही उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी व्यक्त केला आहे.

जेएनपीए परिसरातील नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे, व तलावाच्या पुनरुज्जीवित करण्याच्या कामांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पामध्ये जलसंस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी जैव अभियांत्रिकी तंत्रांचा समावेश आहे.ही कार्यपद्धती एखाद्या इकोसिस्टमला शक्य तितक्या नैसर्गिकरित्या कार्य करण्यास परवानगी देण्याच्या मूलभूत तत्त्वांभोवती फिरते.यासाठी प्रत्येक जलसाठ्याच्या पाणलोट क्षेत्राच्या पर्यावरणीय वैशिष्ट्यांचे विश्लेषण करण्यासाठी इकोलॉजिकल बेसही तयार करण्यात आले आ-हेत. डासांचा धोका, अत्याधिक अल्गल वाढीमुळे युट्रोफिकेशन समस्या आणि आक्रमक प्रजातींचे वर्चस्व यांसारख्या साचलेल्या पाण्याशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठीही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. नैसर्गिक दगडांच्या कडा आणि गॅबियन्स पर्यावरणाची नैसर्गिकरित्या भरभराट होण्यास करते . तसेच सूक्ष्म जीव आणि जलजीवांना चांगल्याप्रकारे प्रजनन आणि मुसळ घालण्याची जागा प्रदान करतात.यामुळे काँक्रीट,आरसीसी, बायोडिग्रेडेबल नसलेल्या साहित्याचा कोणताही वापर या कामासाठी करण्यात येणार नसुन, त्याऐवजी गॅबियन भिंती, धारण बंधारे , ग्रीन ब्रिज कॉयर मॅट्स कॉयर रोल , जीसीएल लाइनर आदी इको तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

मनोज पाटील यांना राज्यस्तरीय सेवासन्मान आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

दै.रायगड नगरी । उरण

महाराष्ट्र शिक्षक पॅनल च्या वतीने राज्यातील गुणवंत शिक्षकांना देण्यात येणारा राज्यस्तरीय सेवासन्मान आदर्श शिक्षक पुरस्कार २०२२ हा पुरस्कार उरण तालुक्यातील पाणदिवे गा-वातील सुपुत्र सध्या सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील सुधागड विद्यासंकुलात अध्यापनाचे कार्य करत असणारे शिक्षक मनोज पाटील यांना प्रदान करण्यात आला.सदर पुरस्कार पुणे -भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहात सिने अभिनेत्री डॉ.निशिगंधा वाड ,शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

मनोज पाटील यांनी यांनी सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या पेण तालुक्यातील रावे येथील माध्यमिक शाळेत १९९६ मध्ये आपल्या अध्यापण कार्याला सुरूवात केली होती. अध्यापण कार्याबरोबरच तेथे त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशील राहीले आहेत.जानेवारी २०१४ मध्ये ते सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील सुधागड विद्यासंकुलात कार्यास सुरवात केली. तेथेही ते शैक्षणिक कार्याबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशिल आहेत.

शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांनी आपल्या महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवे या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सामाजिक ,शैक्षणिक,आरोग्य,क्रीडा व पर्यावरण क्षेत्रात भरीव कार्य केले आहे.आज पर्यंत त्यांना भारत सरकार चा युवा पुरस्कार ,रायगड जिल्हा परिषदचा आदर्श शिक्षक पुरस्कार ,रायगड भूषण पुरस्कारासह अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत .सदर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शाळेचे प्राचार्य राजेंद्र पालवे ,उपप्राचार्या सरोज पाटील ,महाराष्ट्र शिक्षक पॅनल रायगड विभाग प्रमुख सुरेश शिंदे,शिक्षक कर्मचारी वर्ग, चाहत्यांनी शिक्षक मनोज पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ कोरोना संकटकाळातील अतुलनीय कार्याबद्दल सन्मानित

प्रसादासाठी अन्नधान्य, अशी हरएक आवश्यक मदत करून कोरोना काळात नागरिकांना मोठा दिलासा देण्याचे काम झाले आहे. मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सचिव परेश ठाकूर आणि सहकाऱ्यांनी कोरोना महामारीची कोणतीही तमा न बाळगता स्वतः जाऊन मदत केली, अन्नछत्राच्या माध्यमातून भुकेल्याला पोट भरून स्वतः जेवू घातले. कोरोनाला घाबरून न जाता गरजूंना त्यांच्या दारापर्यंत मदत पोहोचविण्याचे त्यांनी केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने देताना आपला-परका भेद केला जात नाही. गरजवंतांना प्रथम मदत करण्याचा दृष्टिकोन ठेवून हे मंडळ काम करीत असतो. ' एक तीळ सात जणांनी वाटून खावा!' ही आपली संस्कृती, आणि त्या अनुषंगाने परिस्थितीने गांजलेल्या गरीब गरजूंना सर्व प्रकारची मदत देण्याचे काम महापूराप्रमाणे यावेळी कोरोना काळातही केले गेले. एवढेच नाही तर गावागावात, शहरोशहरी सर्व सुखरूप आहेत कि नाही याची विचारणाही यावेळी करण्यात आली. अन्नधान्य असो किंवा मेडिकल साहित्याची मदत किंवा विचारपूस हे कार्य खऱ्या अर्थाने माणुसकीचे दर्शन घडविणारे होते. म्हणूनच श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाला अतुलनीय कार्याबद्दल शासन आणि विविध संस्थेने सन्मानित केले आहे. त्याचबरोबर आज पनवेल महापालिकेच्यावतीने कृतज्ञता सन्मान करण्यात आला असून त्या निमिताने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. यावेळी देण्यात आलेल्या सन्मानपत्रात म्हंटले आहे कि, आपल्या संस्थेच्या वतीने कोविड १९ महामारीच्या संकटामध्ये पनवेल ग्रामीण व शहरी भागामध्ये सर्व नागरिकांना धान्य वाटप करून आपल्या सामाजिक संस्थेने सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम केले आहे. संकटामध्ये सापडलेल्या नागरिकांना आधार देण्याकरिता आपल्या संस्थेने केलेले कार्य निश्चितच अनमोल आहे. आपल्या संस्थेने दिलेल्या योगदानाबद्दल पनवेल महानगरपालिका सदैव आपली आभारी आहे. आपण दिलेले योगदान व सेवाकार्य आम्हाला प्रेरणादायक आहे.

विहूर व चिकणी पुलाच्या रस्त्याच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम नाही

ग्रामस्थ करीत आहेत. २७ जुलै पावसात चिकणी व विहुर पुल वाहून आज या घटनेला दहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी होऊन सुद्धा हे दोन्ही पुल पूर्ण करण्यात आलेले नाही. या दोन्ही पुलाबाबत येथील स्थानिक पत्रकारांनी कार्यकारी अभियंता यांना विचारणा केली असता दोन्ही कामे टेंडर प्रक्रियेत असून सिमेंट काँक्रिट ची संरक्षक भिंत बांधणार असल्याचे त्यावेळी सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र मातीचा भराव टाकला गेल्याने पावसाळ्यात हा भराव वाहून जाणार असून पुन्हा वाहतूक थांबावी लागणार आहे. दोन्ही पुलाचे काम सुरुवाती पासून खूप हळू हळू करण्यात येत होते व आजतागायत या कामाने कधीही वेग घेतला नाही. त्यामुळे स्थानिक नागरिक चिंताग्रस्त झाले आहेत. या पुलास संरक्षक भींत हि सिमेंट काँक्रिटची असने आवश्यक आहे. परंतु सदरची भींत न बांधताच फक्त मातीचा भराव टाकण्यात येऊन काम पूर्ण केल्याचा कांगावा केला जात असल्याने येथील ग्रामस्थ नाराज असून सदरचे काम प्रामाणिक पणे करावे अशी मागणी करीत आहेत.

शेतकऱ्यांनी कोकण विकासाचे शिल्पकार व्हावे : आ.दिपक केसरकर

विविध पध्दतीचा उहापोह करीत ते म्हणाले की, सर्वात फायदेशीर पध्दतीची शिफारस कुलगुरुंनी केल्यास त्यास अनुदान देण्याची शिफारस शासनाकडे करता येईल. शेतीमध्ये यांत्रिकीकरणाची गरज प्रतिपादित करीत ते म्हणाले की, औजारे बँक योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ७५ टक्केपर्यंत अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. शेतकऱ्यांनी कणगर, सुरण, हळद यासारखी आंतरपिके घ्यायला हवीत तसेच मूरघास व इथेनॉल तयार करण्याचे नियोजन करावे. काजू , नारळ पिकांवरील प्रक्रिया उद्योगांना अनुदान देऊन कोकणचा कायापालट करण्याची मनिषा त्यांनी व्यक्त केली. कृषि पर्यटन, मत्स्य संवर्धन सारखी दालने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्टया सबळ करु शकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शेतकन्यांनी बोलायला शिकले पाहिजे, असे मत व्यक्त करीत विचार मंथनातून समस्या सुटण्यास मदत होते, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी प्रामाणिकता जोपासून वेळेवर कर्जपूर्ती केल्यास ५० टक्के बोनस त्याला मिळू शकेल, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी हा कार्यक्रम माजी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कमालीच्या दृढनिश्चितीच्या गुणवत्तेमुळे होतोय, असे गौरवोद्गार काढले. ज्या विद्यापीठातून शिक्षण घेतले त्याचा कुलगुरु होण्याचे भाग्य लाभल्याबद्दल कृतकृत्य झाल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. कोव्हीड - १९ मुळे दोन वर्ष कार्यक्रम न घेता आल्याबद्दलची खंत व्यक्त करीत येत्या काळात प्रत्येक महाविद्यालय व संशोधन केंद्रांवर विविध उपक्रम आयोजित करण्याचे सुतोवाच त्यांनी केले.

प्रास्ताविकात डॉ . संजय भावे यांनी मनीऑर्डर संस्कृतीवर असलेला कोकण कात टाकत असल्याबद्दल अभिमान व्यक्त करीत १३५ कोटी जनतेला अन्नधान्य पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांत कृषि साक्षरता, त्यातून कृषि व्यवस्थापन आणि व्यवस्थापनेतून समृध्दी आणण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे पंतप्रधानाचे धोरण व ' विकेल ते पिकेल ' च्या माध्यमातून शेतकऱ्यांत समृध्दी आणण्याची मुख्यमंत्र्यांची संकल्पना पूर्ण करण्याच्या दृष्टीने विविध परिसंवादाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. माजी विद्यार्थ्यांनी लगेच प्रतिसाद देऊन मेळावा आयोजित केल्याचा सार्थ अभिमान त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. डी. देसाई यांनी केले. आभार माजी विद्यार्थी भारतीय जीवन विम्याचे विकास अधिकारी अजय कानडे यांनी मानले.यावेळी पितांबरी उद्योग समूहाचे मुख्य परिचालन अधिकारी मधुकर पुजारी, लाल बहादूर शास्त्री सोशल फोरम ऑफ महाराष्ट्र चे अध्यक्ष डॉ रवींद्र मर्दाने,युवा परिवर्तनचे सहयोगी संचालक सुरेश उतेकर, पोलीस मित्र संघटनेचे दशरथ मुने यांच्यासह माजी विद्यार्थी व शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

सावधान नोटीस/जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : देवद, ता.पनवेल येथील सर्व्हे नं.४१/१ क्षेत्र ०-५०-० या मिळकतीमध्ये मे.ओमकार कृपा रियाल्टर्स या फर्मचे हक्क व हितसंबंध निर्माण झालेले आहे. मौजे : देवद, ता.पनवेल येथील सर्व्हे नं.४१/१ या मिळकती संदर्भात मुळ मालक श्री.शशिकांत कृष्णाजी पाटील व श्री.मनोजकुमार रामलाल अगरवाला तसेच श्री.महावीर हरनामदास अगरवाल यांच्यामध्ये लिमिटेड ल्याबिलीटी पार्टनरशिप ॲग्रीमेंट हा दि.१२/०१/२०१८ रोजीचा दस्त झालेला आहे.

सदर दस्तास अनुसरुन श्री.शशिकांत कृष्णाजी पाटील यांच्यासह सर्वे नं.४१/१ या मिळकती संदर्भात सह हिस्सेदार असलेले श्रीमती.नंदिनी अंकुश शिंदे व मे.ओमकार कृपा रियाल्टर्स तर्फे श्री.शशिकांत कृष्णाजी पाटील यांच्यामध्ये नोंदणीकृत दस्त क्र.पवल २ हा १५४८६/२०१८ हा लॅण्ड कॉन्ट्रब्युशन ॲग्रीमेंट हा दस्त बनवलेला होता व आहे. तसेच त्यासंदर्भामध्ये दि.१६/०२/२०१९ रोजी नोंदणीकृत दस्त पवल २ हा २१३२/२०१९ या दस्तान्वये दुरुस्ती दस्त नोंदविले आहे. तसेच सर्वे नं.४१/१ या मिळकती संदर्भात अर्जदार, श्री.महावीर हरनामदास अगरवाल, श्री.शशिकांत कृष्णाजी पाटील, श्री.चंद्रकांत शांतीलाल जैन, श्री.शशिकांत तुलीराम जाधव, श्री.विनोद पालस्मल पलरेशा मुळ सह हिस्सेदार श्रीमती.नंदिनी अंकुश शिंदे व मे.ओमकार कृपा रियाल्टर्स यांच्यामध्ये सप्लीमेंटल एलएलपी ॲग्रीमेंट झालेला आहे. सबब सदर मिळकतीमध्ये श्री.मनोजकुमार रामलाल अगरवाला तसेच इतर वर नमूद व्यक्ती यांचा हक्क व हितसंबंध सर्वे नं.४१/१ या मिळकतीमध्ये निर्माण झालेला होता व आहे.

सदर मे.ओमकार कृपा रियाल्टर्स या फर्मचे पार्टनर कै.महावीर हरनामदास अगरवाल हे मयत झाले असून त्यांना वारस श्री.मनोज महावीर अगरवाल व श्री.विजय महावीर अगरवाल हे आहेत.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती असताना श्री.मनोजकुमार रामलाल अगरवाला यांना खात्रीशीर मिळालेल्या माहिती नुसार सदर मिळकत सर्वे नं.४१/१ ही मिळकत मुळ मालक बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत.

तरी सदर मिळकती बाबत अगर तिच्या कोणत्याही भूभागाबाबत कोणीही साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, वहिवाट, लीज, कुळ हक्क अगर अन्य कोणत्याही तऱ्हेचा व कसलाही हक्क, हितसंबंध व कर्ज, बोजा वगैरे संदर्भात व्यवहार केल्यास सदरच्या बेकायदेशीर व्यवहाराची सर्वस्वी जबाबदारी त्या व्यक्तीवर राहील याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि.१६/०५/२०२२

सही/-
श्री.मनोजकुमार रामलाल अगरवाला
रा.फ्लॅट क्र.९०१, ९ वा मजला,
कास्केडस्, टॉवर नं.२, ॲक्शन
एरिया, युनिवर्ल्ड सिटी, डाऊन
टाऊन, कलकत्ता ७००१५६ पं.बंगाल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

क्रिकेटचा महासंग्राम गणेशआळी प्रीमियर लीग २०२२ जल्लोषात संपन्न

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

श्रीवर्धन शहरातील गणेश आळी येथे क्रिकेटचा महासंग्राम प्रीमियर लीग २०२२ चे आयोजन दिं १५ मे २०२२ रोजी करण्यात आले होते. स्पर्धेत प्रथम क्रमांक एस जी सीसी लायन या संघाने पटकावला व उपविजेता एस जी सी सी किंग संघ राहिला. स्पर्धेतील मालिकावीर विशाल सातम, सर्वोत्कृष्ट गोलंदाज नंदन सातम, उत्कृष्ट फलंदाज यशवंत (गोटू) वाठोरे, ऑरेंज कॅपचे मानकरी मिहीर सातम, पर्पल कॅपचे मानकरी यश सातम (ऑरेंज कॅप आणि पर्पल कॅप कै. शिवराम सातम यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुवर्णा शिवराम सातम यांनी दिल्या. यांना सन्मानित करण्यात आले. ४०+ चे विजेते राजू सुर्वे यांचा संघ, महिला विजेते एस जी सीसी क्वीन संघ, प्रत्येक सामन्यातील सामानावीराला गौरवण्यात आले. गणेश आळी पाखाडीत मर्यादित असलेल्या या प्रीमियर लीग पहिल्या हंगामात लहान मुलांपासून महिला, जेष्ठ माणसांपार्यंत सर्वांना खेळण्याची संधी प्राप्त झाली. पहिल्या पर्वात स्पर्धा आनंदात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. पाखाडीचे अध्यक्ष विजय भगत, त्यांचे सर्व सहकारी मित्रांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतली स्पर्धेतील सर्व चषक माजी अध्यक्ष शंकर सखाराम भगत यांनी प्रायोजित केल्या, तर सर्व मेडल्स अक्षय सातम यांनी प्रायोजित केले. संपूर्ण स्पर्धेचे नीट नेटके सूत्रसंचालन अमित कंगणे यांनी केले. स्पर्धेची सुरुवात जेष्ठ नागरिक मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन फित कापुन श्रीफळ वाढवून करण्यात आले. स्पर्धा दिवसरात्र सत्रात असल्याने स्टेज सह प्रकाशझोत सिस्टीम गोटू वाठोरे व त्यांच्या सहकारी मित्रांनी पुरवली .स्पर्धा संपन्न होई पर्यंत पाखाडीतील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली होती. सर्व वयाच्या घटकांना खेळण्याची संधी दिल्याने आयोजकांवर अभिनंदन व शुभेच्छा चा वर्षाव करण्यात आला, पहिलेच पर्व आनंदांत यशस्वी संपन्न झाल्याने पाखडकरांनी समाधान व्यक्त करून आयोजकांना धन्यवाद देत दरवर्षी स्पर्धा आयोजित करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. मंगळवार दिं १७ मे रोजी सर्व गटासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

मनोज खेडकर आणि सुनील शिंदेंच्या संघर्षमय भूमिकेमुळे माथेरानची विकासात्मक वाटचाल

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरान हे राज्यातील कदाचित एकमेव पर्यटनस्थळ असावे की ज्याठिकाणी नागरिकांना मूलभूत सेवासुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी आपला हक्क प्राप्त करून घेण्यासाठी संघर्षाची तयारी करावी लागली आहे आणि त्या संघर्षातुन यश संपादन करण्यात माथेरान कर पुरेपूर यशस्वी सुध्दा ठरले आहेत. अनेक पक्ष इथे आपापल्या परीने जरी कार्यान्वित असले तरीसुद्धा एखाद्या अशक्यप्राय कामांचा पाठपुरावा करून न होणाऱ्या बाबीला कृतीत साकारणे ही अत्यंत अवघड किमया आजपर्यंतच्या कालावधीत केवळ मनोज खेडकर यांनी अल्प कालावधीच्या सत्तेत असताना आणि सत्तेत नसताना सुध्दा केलेली दिसून येत आहे.

याचे उदाहरण म्हणजे मागील जवळपास चार दशकांपासूनचे माथेरान करांचे कर्जत ते माथेरान दरम्यान मिनीबस सेवा उपलब्ध व्हावी हे स्वप्न साक्षात उतरविण्याचे कार्य तत्कालीन नगराध्यक्ष मनोज खेडकर यांच्या अथक परिश्रम ,जिद्द आणि चिकाटीच्या बळावर पूर्णत्वास आले होते. हे काम बहुधा कोणत्याही राजकीय पक्षांच्या नेत्यांना अशक्यप्राय होते कारण मिनीबस सेवा सुरू व्हावी ही जरी सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांची प्रबळ इच्छाशक्ती असली तरीसुद्धा यामागे येणाऱ्या संकटांचा सामना त्याचप्रमाणे खाजगी वाहन चालकांचा प्रखर विरोध घेण्यासाठी कुणीही पुढे येण्यास तयार नव्हता कारण अन्य काही पक्षाच्या नेत्यांनी सोयीचेच राजकारण केले होते आणि आजही करीत आहेत यात शंकाच नाही हे सर्वच स्थानिकांना ज्ञात आहे.

११ ऑक्टोबर २००८ मध्ये अनेक संघर्षांवर मात करून आव्हानात्मक विरोध पत्करून स्वतः च्या जीवाची पर्वा न करता केवळ या आपल्या गावातील शालेय विद्यार्थ्यांना, व्यापारी वर्गाला आणि नागरिकांना सुरक्षित आणि स्वस्त दरात प्रवासाची सोय उपलब्ध व्हावी, शालेय विद्यार्थ्यांना पुढील महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे जेणेकरून इथला सुशिक्षित वर्ग उत्तम प्रकारे शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभा राहू शकतो. व्यापारी वर्ग आपल्या दुकानासाठी लागणारे साहित्य आणण्यासाठी मिनीबसच्या सुलभ,सुरक्षित सेवेमुळे ये जा करू शकतो. सर्वसामान्य नागरिक घरगुती सामान आणण्यासाठी नेरळ, कर्जत वा अन्य ठिकाणी जाऊन येऊ शकतो याकामी तत्कालीन नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी खूपच मेहनतीने ही मिनीबस सेवा सुरू करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे.त्यामुळेच आज सर्व माथेरान कर या मिनीबस सेवेचा लाभ घेताना दिसत आहेत. त्याचप्रमाणे खेडकर यांनी आपल्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात पनवेल धोदाणी मार्गे फिनिक्युलर रेल सेवा सुरू करण्यासाठी सुध्दा प्रयत्न केले होते सर्वात महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण होण्याच्या मार्गावर असताना तालुक्यातील काही मंडळींनी केवळ मतांच्या राजकारणापायी या प्रकल्पाला विरोध केल्यामुळे हे सर्वच माथेरान करांच्या दृष्टीने आणि पर्यटन वाढीच्या दृष्टीने गाव काही वर्षे अधोगतीला गेले होते. याची सर्व स्थानिकांना कल्पना आहे.

राजकीय दृष्ट्या एखाद्या राजकारणी व्यक्तीचा स्वभाव हा जरी वेगळा असला तरी त्या व्यक्तीच्या माध्यमातून गावाचा सर्वांगीण विकास कशा पद्धतीने होऊ शकतो याचे सुतराम ज्ञान काहींना नसल्याने कार्यशील व्यक्ती नेहमीच पिछाडीवर असतात. याचाही अनुभव सुज्ञ लोकांना वेळेनुसार येत असतो.

माथेरान मध्ये आजही ब्रिटीश कालीन गुलामगिरी प्रमाणे हातरीक्षा ओढण्याची अमानवीय प्रथा सुरू आहे.शालेय विद्यार्थ्यांना चार ते पाच किलोमीटर अंतरावर शाळेत पायपीट करावी लागत आहे. आबालवृद्ध मंडळींना वाहतुकीची सुविधा नसल्याने इच्छा असून देखील जेष्ठ पर्यटक या सुंदर स्थळापासून वंचित राहतात. जीवनावश्यक वस्तूंच्या अवाजवी वाहतुकी कामी जादा दराने साहित्य खरेदी करावे लागते. दवाखान्यात जाण्यासाठी सुध्दा वेळप्रसंगी हातरीक्षा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळेच स्थानिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.माथेरान हे पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित केल्यामुळे इथे मोटार वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. माथेरानच्या पर्यावरणाचे संरक्षण करीत इथे पर्यावरण पूरक अशा बॅटरी वर चालणाऱ्या ई रिक्षाला परवानगी मिळावी जेणेकरून हातरीक्षा ओढणाऱ्या श्रमिकांना, शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी आणि आबालवृद्ध पर्यटकांना या स्थळाचा आनंद घेता यावा यासाठी ई रिक्षा हाच शेवटचा आणि उत्तम पर्याय उपलब्ध होऊ शकतो याकामी सामाजिक कार्यकर्ते ,श्रमिक रिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदेंनी मागील दहा वर्षांपासून शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला आहे आणि स्वखर्चाने ई रिक्षासाठी लढा दिला आहे त्यास सर्वच स्तरातून हिरवा कंदील मिळाल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ई रिक्षा सेवेमुळे गावातील बहुतांश लोकांना याचा मोठया प्रमाणात लाभ घेता येणार आहे. या सेवेमुळे माथेरान हे खऱ्या अर्थाने जगाच्या नकाशावर आपले अढळ स्थान निर्माण करणार आहे. सर्वांना सोयीस्कर आणि स्वस्तात प्रवास उपलब्ध होण्यासाठी ई रिक्षा हे एकमेव साधन यानिमित्ताने लवकरच उपलब्ध होणार आहे. या दोन्हीही मंडळींनी ही जी काही महत्वाची कामे पूर्ण केली आहेत ती गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि इथे पर्यटन क्रांती घडविण्यासाठी आहेत त्यामुळे आगामी काळात नक्कीच हे पर्यटनस्थळ पर्यटन वाढीमुळे नावारूपाला येणार आहे यात तिळमात्र शंका नाही.

आई-लडीलांचे कर्म मुलांच्या वाट्याला येते : ह.भ.प.काशिनाथ महाराज वाघुले

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

आई-वडील जसे कर्म करतात तेच कर्म मुलांच्या वाट्याला येत असल्याचे उद्गार रायगड भूषण किर्तनकार ह.भ.प.काशिनाथ महाराज वाघुले यांनी धानकान्हे येथे व्यक्त केले.

रोहे तालुक्यातील धानकान्हे या गावी समस्त कचरे परिवार यांच्या तर्फे रिक्षाचालक संतोष कचरे व त्यांच्या परिवारातील दिलिप कचरे, मारूती कचरे, श्याम कचरे, शरद कचरे, नरेश कचरे यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या श्री. सत्यनारायणाची महापूजेनिमित्त संपन्न करण्यात आलेल्या विविध धार्मिक कार्यक्रम अंतर्गत आपल्या किर्तनसेवेप्रसंगी ह.भ.प.काशिनाथ महाराज वाघुले भाविकांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी सर्वश्री महादेव माहीत, सखाराम कचरे, महादेव जाधव, पांडुरंग गोसावी, सहादेव बाईत, सुदाम कचरे, दीपक गोसावी, रवींद्र मरवडे, नितीन कचरे, भूषण वरखले, विनोद कोस्तेकर, अशोक शिंदे आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे ह.भ.प.काशिनाथ महाराज वाघुले यांनी या चराचर सृष्टीत सर्वत्र देव सामावला असून देवाचे अस्तित्व मान्य करून आपण आपल्या जीवनाची वाटचाल करावी. तर या देहाचे माध्यमातून सतत सत्कर्म करुन आपले जीवन सार्थकी लावावे असे शेवटी सांगितले.

आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

दै.रायगड नगरी । पनवेल

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत रेवदंडा यांच्या वतीने पदमश्री डॉ. श्री दत्तात्रेय नारायण तथा अप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त तीर्थरूप डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल येथील विरुपाक्ष सभागृहामध्ये सोमवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ११७७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीर कार्यक्रमामध्ये श्रीसदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज सर्वत्र रक्ताची गरज भासत आहे अनेकांनी रक्त न मिळाल्याने आपले प्राण गमावले आहे. त्यामुळे रक्ताची भासत असलेली गरज दूर करण्यासाठी पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारीयांच्या वाढदिवसानिमित्ताने डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्यामार्फत रक्तदान शिबिर राबविण्यात आले.

शिबिरामध्ये रक्तदान करण्यासाठी दास भक्तांनी सकाळ पासूनच शिस्तबद्ध पद्धतीने आपला सहभाग घेतला होता. या आगोदरही प्रतिष्ठानमार्फत भव्य रक्तदान शिविर, आरोग्य शिबीर, स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवढ, वृक्ष संवर्धन मोहीम राबविण्यात आली आहे. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर सीता पाटील, जेष्ठ नेते बाळासाहेब पाटील, शिवसेनेचे संपर्कप्रमुख बबन पाटील, नगरसेवक मनोज भुजबळ नगरसेवक राजू सोनी, सभापती एडवोकेट वृषाली वाघमारे, नगरसेविका रूचिता लोंढे, डॉ. ययाती गांधी, त्याचबरोबर डी. वाय. पाटील, एम. जी. एम. तेरणा हॉस्पिटल मधील डॉक्टर, व त्यांचे सहकारी, श्री सदस्य या वेळी उपस्थित होते.

अँटी करप्शन आणि क्राइम कंट्रोल क्लबची सभा संपन्न

दै.रायगड नगरी । उरण

मु. भेंडखळ, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे अँटी करप्शन आणि क्राइम कंट्रोल क्लबची सभा संपन्न झाली. महाराष्ट्र अध्यक्ष सागर ठाकूर यांच्या अध्यक्षते खाली ही सभा संपन्न झाली. समाजामध्ये आज जे काही राजकीय वातावरण सुरू आहे.आणि राजकीय परिस्थिती मुळे सर्वसामान्य माणूस महागाई - बेरोजगारी मध्ये भरडला जाताना दिसत आहे. अशावेळी समाजामध्ये राजकीय हिंसा किंवा वाद घडू नयेत आणि आपण सारे भारतीय आहोत भारतीय म्हणूनच रहायला पाहिजे हे विचार त्यांनी उपस्थितांना पटवून दिले.

तर समाजामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात सर्वच संघटना उभ्या राहतात मात्र पुरुषांवर सुद्धा कधीकधी अन्याय होताना दिसत असतात. पण अशा पीडित पुरुषांसोबत सुद्धा मागितल्यास मदतीचा हात देवून उभे राहू असे वक्तव्य त्यांनी केले. आज समाजामध्ये अनेक ठिकाणी अनधिकृत पार्किंग, अनधिकृत प्रवासी वाहतूक त्याचबरोबर बेकायदेशीर जमीन विक्रीतून शेतकऱ्यांची होणारी घोर फसवणूक अशा विषयांवर यावेळी चर्चा झाली. तर एक सामाजिक बांधिलकी म्हणून वारकऱ्यांसाठी छोटेखानी कार्यक्रम करण्याच्या सूचना सर्व सदस्यांना देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उरण तालुका अध्यक्ष विजय भोईर यांनी केले. तर या कार्यक्रम प्रसंगी उरण प्रतिनिधी लिलेश्वर ठाकूर, किरण पाटील, दिपक भोईर, सतीश सोनलकर (सातारा) कुमारी मनीषा खरात (उलवे नोड) तसेच अंबरनाथ विभागीय अध्यक्ष मनोहर पाटील, सदस्य उमेश साळुंखे, सदस्य चंदन मढवी, सदस्य किरण पाटील, सदस्य अशोक जाधव, सदस्य शशिकांत इटम (पालघर) इत्यादी सहकारी उपस्थित होते. शेवटी सर्वांनी समाजामध्ये होणारी कोणतीही बेकायदेशीर घटना माहीत असताना लपवून न ठेवण्याचे आवाहन महाराष्ट्र अध्यक्ष सागर ठाकूर यांनी उपस्थित सर्वांना केले. अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी नागरिकांनी या संस्थेत सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

बेशुद्ध अवस्थेत सापडलेल्या अनोळखी इसमाचा मृत्यू

दै.रायगड नगरी । पनवेल

सोमटणे येथे बेशुद्धावस्थेत सापडून आलेल्या अनोळखी इसमाला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले आहे. या इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस घेत आहेत. या इसमाचे नाव गोविंद नेपाळी असून वय अंदाजे पन्नास वर्षे आहे. याबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक भोईर यांच्याशी संपर्क साधावा.

शुद्धीपत्रक

'रायगड नगरी' च्या दि.१४/०५/२०२२ रोजीच्या अंकामध्ये 'जाहीर नोटीस' या मथळ्यामध्ये प्रसिद्ध झालेल्या नोटीसीमध्ये मिळकतीच्या वर्णनामध्ये नजरचुकीने

मौजे : पुष्पक नगर, ता.पनवेल, जि.रायगड

फाईल क्र.	सेक्टर क्र.	भूखंड क्र.	क्षेत्र चौरस मि.
OWA-125	८	६६	२२०१.११

असे छापून आले आहे. तरी सदरचे मिळकतीचे वर्णन

मौजे : पुष्पक नगर, ता.पनवेल, जि.रायगड

FILE NO.	SECTOR NO.	PLOT NO.	AREA IN SQ.MT.	CUR.DED. IN SQ.MT	NET AREA IN SQ.MT
OWA-125	8	66	2201.11	R10=21.46	2179.65

असे आहे व असे वाचण्यात यावे. येणेप्रमाणे शुद्धीपत्रक आहे.

दि.१६/०५/२०२२

सही/-
अशिलातर्फे वकील
सुनिता राम पाटील
Advocate & Notary Public
(M.Com, M.A., L.L.M, G.D.C. & A)
Shop No.26, Sec-1 A, Prabhat Center
CBD-Belapur, Navi Mumbai-400614
9867688788 (SMS whatsapp only)

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे : काळुंद्रे येथील कै.नामदेव हाल्या कोनकर व कै.नारायण हाल्या कोनकर यांच्या मिळकती नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत झाल्या असून त्याचे मोबदल्यात सिडकोने त्यांचे वारसांना मौजे : करंजाडे येथील सेक्टर क्र.३ मधील भूखंड क्र.१६९ (ए) क्षेत्र १५० चौ.मी.चा भूखंड वितरित केलेला आहे.

सदर श्री.नारायण कोनकर व श्री.नामदेव कोनकर यांच्या वारसांनी सदर भूखंडाबाबत आमचे अशिल मे.राज बिल्टेक तर्फे श्री.राजेश मारुती मढवी यांचे लाभात करार करून दिलेला आहे. सदर कराराच्या पुर्ततेसाठी आमच्या अशिलांनी पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात स्पे.मु.क्र.४४७/२०२१ दाखल केलेला असून सदर दावा न्यायप्रविष्ठ आहे.

सदर दाव्यात सदर भूखंडाबाबत आमच्या अशिलांचे हक्क व अधिकार अस्तित्वात असताना त्यांनी मे.वैष्णवी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री.अभिषेक दिवाकर यांचे नावे ट्रान्सफर केलेला आहे. त्यामुळे सदर भूखंडाचे टायटल क्लीयर व लिगल नाही व दाव्याच्या निकालाच्या अनुसरुन राहील. सदर दाव्याचा निकाल संबंधितांवर बंधनकारक राहील. त्यामुळे सदर भूखंडावरील इमारतीमधील सदनिका व गाळे याबाबत कोणीही सदर श्रीमती.बेबी हिरा उर्फ तारामती हिरु कोनकर व उर्फ उदरे व इतर यांच्या बरोबर तसेच मे.वैष्णवी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांचे बरोबर खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये व केला असल्यास तो ताबडतोब रद्द करून घ्यावा. सदरचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर भूखंडावरील कोणत्याही सदनिकेचा व्यवहार हा दोष मुक्त व न्यायालयात प्रलंबित असलेल्या दाव्याचा निकाल संबंधितांवर बंधनकारक राहील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१६/०५/२०२२

सही/-
श्री.संजय ग. पाटकर
बि-१४, राधाहरी निवास
कॉम्प्लेक्स, लो.टिळक रोड, पनवेल
मो.नं.९९२००२७७३८

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदरहू मिळकत श्री.अविनाश राजाराम म्हात्रे रा.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांनी खलील मिळकती साठेकराराद्वारे विकत घेतल्या आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन
मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार
८	३/१	०-३४-०	०.६७ पै
८	८	०-१५-०	०.३७ पै

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे : पुनाडे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं.८/३/१ क्षेत्र ०-३४-० (हे.आर.पॉ.) व सर्व्हे नं./हिस्सा नं.८/८ क्षेत्र ०-१५-० (हे.आर.पॉ.) एवढी मिळकत आमचे अशिल श्री.अविनाश राजाराम म्हात्रे यांनी साठेकरार करून मुळ मालक श्री.नारायण आंब्या म्हात्रे यांना खरेदीखताचा पूर्ण मोबदला अदा करून मिळकतीचा ताबेकब्जा, वहिवाट आमचे अशिलांना मुळ मालक यांनी दिला असून आजपर्यंत सदरच्या मिळकती आमचे अशिलांच्या वहिवाटीस व शांततामय, ताबेकब्जास अखंडीत आहेत. मात्र मुळ मालक यांच्या चाल-ढकल व वेळकाढू पणामुळे सदरहू मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत आमचे अशिलांची करण्याची इच्छा व तयारी असताना मुळ मालक श्री.नारायण आंब्या म्हात्रे यांच्या वेळकाढुपणामुळे व त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस यांनी वेळकाढूपणा केल्यामुळे खरेदीखत नोंदणीकृत करण्याचे राहून गेले आहे. आजतागायत देखील सदरहू मिळकतीवर आमच्या अशिलांचा ताबेकब्जा व वहिवाट आहे.

तरी सदरहू मिळकतीचे संदर्भात कोणीही वरील सदरहू मिळकतीमध्ये कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाणखत, खरेदीखत, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. व तत्सम दस्त केल्यास ते दस्त आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सही/-
ॲड.दिनेश द. पाटील
जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४, गावदेवी
मंदिरा समोर, राम गणेश गडकरी मार्ग,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८८७९८९७०६९

ॲड.मिनाक्षी पाटील

जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात पनवेल
चौ.अर्ज क्र.५५५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०६/२०२२

१) श्रीमती.उर्वशी राजेश शर्मा
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रिंगक राजेश शर्मा
वय : ३८ वर्षे, धंदा :
दोघे रा.बि-११०१, अशोका रेसिडेन्सी, प्लॉट नं.३,
अपिजय शाळेसमोर, से.१२, खारघर, रायगड-४१०२१० अर्जदार
विरुद्ध
निल सामनेवाले

वरील अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.१ यांचे वडील कै. राजेश वेदप्रकाश शर्मा यांचे दि.०९/०४/२०२१ रोजी रिलायन्स हॉस्पिटल, कोपरखैरणे स्टेशनसमोर, एमआयडीसी नवी मुंबई येथे निधन झाले. मयताच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

Flat No.1101, Tower No.-B, Admeasuring About 669 Sq. Ft. (62.17 Sq. Mtrs) Carpet area plus 55 Sq. Ft. (5.11 Sq.Mtrs) open terrace on the 11 th Floor of the building in Ashoka Residency, Standing on Plot No.3, Sector-12, Kharghar, Navi Mumbai, Taluka-Panvel, Dist-Raigad. along with covered car parking no.44.

Total Value of Rs.56,50,000/-

And hare Applicants are Claiming on only Half Share (50%) of Property i.e.Value of Property is Rs.28,25,000/-

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०६/०५/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.गोडसे सो

ॲड.मिनाक्षी पाटील
ॲड.मनिषा किसन काळे

जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात पनवेल
चौ.अर्ज क्र.४४९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१८/०६/२०२२

१) श्रीमती.स्वाती सुनील मोहिते
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : फ्लॅट नं.१७०३, चौरंग सीएसएच लि.,
सेक्टर : १६, प्लॉट नं.४, सानपाडा, नवी मुंबई
२) कु.ऐश्वर्या सुनील मोहिते
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
पत्ता : फ्लॅट नं.१७०३, चौरंग सीएसएच लि.,
सेक्टर : १६, प्लॉट नं.४, सानपाडा, नवी मुंबई अर्जदार
विरुद्ध
श्रीमती.प्रमिला शिवाजीराव मोहिते, वय : ८० वर्षे,
पत्ता : साजुदा बालविद्या मंदिर समोर,
सदनिका क्र.१०१, अन्वर आर्केड, चक्रधरनगर,
अयोध्या नगर, नागपूर-४४००२४ सामनेवाले

वरील अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील व सामनेवाले यांचा मुलगा कै.सुनील शिवाजीराव मोहिते यांचे दि.१७/१२/२०२० रोजी निधन झाले. मयताचे नावे असलेली मिळकतीचे वर्णन

Flat No.B-901, 9 th Floor, in the building known as ELITE HEIGHTS, Plot No.176+178 and 191, Sector-10, Kopra, Kharghar, Tal. Panvel, Dist-Raigad, admeasuring 568.203 sq.fts. Carpet + 52.807 sq.mtrs flower bed / balcony area. (half Share of area 284.1015 sq. fts. Carpet + 26.4035 sq.mtrs. flower bed / balcony area)

Total Value of Rs.50,00,000/-

And hare Applicants are Claiming on only Half Share (50%) of Property i.e.Value of Property is Rs.25,00,000/-

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३०/०४/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

५० ते ५५ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळला

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल –पुणे जुन्या हायवेवरील चिखले बस स्टॉपजवळ पनवेल तालुका पोलिसांना ५० ते ५५ अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला आहे. या इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस घेत आहेत. त्याचा रंग सावळा, डोक्याचे केस काळे, पांढरे वाढलेले आहेत. त्याची उंची १६५ सेंटिमीटर असून अंगात फुल बाहयांचा पांढऱ्या रंगाचा शर्ट व निळा रंगाची फुल पॅन्ट घातलेली आहे. याबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक भोईर यांच्याशी संपर्क साधावा.

शरद पवार यांच्या विरोधात सोशल मीडियामध्ये बदनामी कारक पोस्ट करणाऱ्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या विरोधात सोशल मीडिया मध्ये बदनामी कारक पोस्ट करणाऱ्या तरुणाविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी तर्फे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील किरण इनामदार या तरुणाने सोशल मीडियावर राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या विरोधात बदनामी कारक पोस्ट केल्याची माहिती राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष व नगरसेवक सतीश पाटील यांना मिळताच त्याच्या मार्गदर्शनाखाली प्रमोद भगत, तुषार पाटील, शहाबाज पटेल, श्रीधर केदारी बागल, रंजित नरुटे, किशोर साळुंके, राजू नलावडे, नितीन त्रिमुखे, हर्षल बडे, इम्रान सुभेदार आदी पदाधिकारांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कादबाने यांची भेट घेऊन सदर घटनेचा निषेध करीत या तरुणावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी अशी मागणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे आमचे दैवत असून त्यांची केलेली बदनामी आम्ही कदापि सहन करणार नाही, सदर तरुणाला अटक करून त्याच्यावर कडक कारवाई करावी असे राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष व नगरसेवक सतीश पाटील यांनी सांगितले.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

जेएनपीएच्या रेल्वे यार्ड, नुतनीकरण करण्यात आलेल्या प्रशासन भवनाचे ना.सर्बानंद सोनवाल यांच्या हस्ते उद्घाटन

पहिल्या शाश्वतता अहवालाचे प्रकाशन : पायाभूत सुविधा, विकास प्रकल्पांचाही मंत्र्यांनी घेतला आढावा

दै.रायगड नगरी । उरण

जेएनपीटीने बंदरात बांधलेल्या डीएफसी कंप्लायंट रेल यार्ड आणि नुकत्याच नूतनीकरण केलेल्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलमार्ग आयुष मंत्री सर्बानंद सोनवाल यांच्या हस्ते रविवारी (१५) करण्यात आले.यावेळी त्यांनी जेएनपीएच्या पहिल्या शाश्वतता अहवालाचे प्रकाशन करताना बंदरातील विविध पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचा आढावा घेतला.

३३ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या जेएनपीएच्या यशस्वी कामगिरीबद्दल अभिनंदन करतानाच केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलमार्ग आयुष मंत्री सर्बानंद सोनवाल यांनी केंद्र सरकारच्या बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन, सागरमाला, एमआयव्ही २०३० आदी विविध उपक्रमांमध्ये जेएनपीएने अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मागील तीन दशकांतील जेएनपीएच्या विविध विकासकामे आणि योगदानामुळेच या बंदराने जागतिक स्तरावर स्वताची अशी वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे सोनवाल म्हणाले.

यावेळी जेएनपीए बंदराच्या मागील ३२ वर्षातील प्रगतीचा आलेख अध्यक्ष संजय सेठी यांनी मांडला. जेएनपीएमध्ये अनेक पायाभूत सुविधा आणि इतर विकासात्मक प्रकल्प सुरू आहेत. बंदरात कार्यान्वित करण्यात आलेल्या विविध ग्रीन पोर्ट उपक्रमांमुळे जेएनपीएच्या व्यवसायात वाढ होणार आहे. तसेच देशाच्या एक्झीम व्यापारालाही चालना मिळणार आहे.बंदरातील सुरू असलेले विविध प्रकल्प मंत्रालयाच्या पुढाकारांशी संरेखित आहेत. ज्यामुळे मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी, लॉजिस्टिक खर्चात कपात आणि व्यवसाय करणे सुलभ होण्यास अधिकच मदतगार साबीत होत आहेत. पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाच्या दिशेने प्रयत्न प्रदर्शित करण्यासाठी बंदराने २०२०–२१ या आर्थिक वर्षासाठी पहिला शाश्वतता अहवाल प्रसिद्ध केला आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात करत असल्याचेही संजय सेठी यांनी सांगितले.

जेएनपीए हे पहिले बंदर आहे जे पूर्णपणे डीएफसी अनुरूप आहे. नवी दिल्ली ते जेएनपीएपर्यंत डीएफसीसीआयएल सुसंगत रेल्वे ट्रॅक टाकले जात आहेत.जेएनपीएच्या जागेवर लोडिंग यार्ड शोधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.लांब पल्ल्याच्या कॉमन यार्डमध्ये डबल–स्टॅक कंटेनर ट्रेनसाठी १५०० मीटरच्या ३ लाइन्स असतात. त्यापैकी दोन कंटेनर लोडिंग आणि अनलोड करण्यासाठी टॉप वायर्ड बॅलास्टलेस लाइन्स असतात.एक इलेक्ट्रिक इंजिनच्या इंजिन टर्नअराउंडसाठी असते.हे काम प्रगतीपथावर असल्याचे सांगतानाच जेएनपीए देशाच्या आर्थिक विकासाच्या वाटचालीत योगदान देण्यासाठी वचनबद्ध असल्याची ग्वाही अध्यक्ष संजय सेठी यांनी दिली. तसेच वस्तू आणि सेवांच्या वाहतुकीतील अडथळे दूर करण्यासाठी आणि सर्वोत्तम यंत्रणा प्रदान करून पसंतीचे बंदर बनून जागतिक पुरवठा साखळींमध्ये सखोल एकीकरणाला समर्थन देण्यासाठी हे बंदर सातत्याने काम करत असल्याचेही सेठी यांनी सांगितले.

दरम्यान बंदरात केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलमार्ग आयुष मंत्री सर्बानंद सोनवाल व इतर मान्यवरांचे आगमन होताच जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष वाघ, उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वागत केले.याप्रसंगी भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवि भोईर, शहराध्यक्ष कौशिक शहा सह बंदराचे अधिकारी उपस्थित होते.

चंदीभाई चौधरी यांच्या मदतीमुळे जेष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान

दै.रायगड नगरी । माथेरान

निराधार, गरजवंतांना ,अपंगांना दरमहा एकहजार रुपयांची पेन्शन स्वरूपात आर्थिक मदत शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी आणि मीरा

फाउंडेशनच्या संचालिका रेखा चौधरी यांच्या माध्यमातून दिली जात आहे. चौधरी दांपत्याने ह्या मदती मध्ये सातत्य ठेवले असून वाटपाचा हा सहावा हप्ता असल्याने ही महत्वपूर्ण मदत अनेकांना औषधे त्याचप्रमाणे अन्य कामासाठी उपयोगी पडत आहे त्यामुळे ही मदत प्राप्त करतांना अनेक जेष्ठांना आनंदाश्रू अनावर झाले.

उपस्थित सर्व जेष्ठांनी चंद्रकांत चौधरी आणि रेखा चौधरी यांना हृदयापासून शुभेच्छा दिल्या. हे महत्वपूर्ण कार्य करण्यासाठी, गोरगरिबांना सढळ हाताने मदत करण्यासाठी खऱ्या अर्थाने स्वतःच्या अंगी दातृत्वाची भावना असावी लागते. आणि ही किमया चंद्रकांत चौधरी, रेखा चौधरी यांनी आपल्या कृतीतून केली आहे. आज दि.१६ रोजी सकाळी अकरा वाजता शिवसेना शाखेत रेखा चौधरी आणि उपस्थित शिवसेनेच्या पदाधिकारी, महिला आघाडीच्या समस्त कार्यकर्त्या त्याचप्रमाणे माजी नगरसेवक संदीप शिंदे, निखिल शिंदे, अनिकेत जाधव यांच्या उपस्थितीत जेष्ठांना एकहजार रुपयांची मदत देण्यात आली. यावेळी महिला आघाडीच्या संगीता जांभळे, युवती सेनेच्या अंकिता तोरणे, ऐश्वर्या शिंदे तसेच अन्य सदस्या ,युवा सेनेचे, युवती सेनेच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होत्या.

गाव तिथे शाखा हा अभियाना संपूर्ण पनवेलभर राबवणार : हेमराज म्हात्रे

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस काँग्रेसची आढावा बैठक रविवार दि १५ मे रोजी काँग्रेस भवनाच्या हॉलमध्ये झाली. ही बैठक सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस तथा पनवेल प्रभारी डॉ. वैष्णवीताई किराड व पनवेल जिल्हा युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाली.या वेळी मान्यवरांचे स्वागत करून मार्गदर्शन हितगुज झाली.

जिल्ह्यातील काँग्रेसचा आढावा व युवकांना पुढील वर्षा भरात विविध कार्यक्रम तसेच महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल जी राऊत यांच्या संकल्पनेतून गाव तिथे शाखा या कार्यक्रमाबाबत चर्चा झाली.

या आढावा बैठकीला पनवेल जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा निर्मला म्हात्रे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच सचिव विश्वजीत पाटील, अभिजित मुंडक्कल, मरफी म्हसकर, स्वप्नील वारंगे, राहुल सावंत, राकेश जाधव, शाहिद मुल्ला, मोरेश्वर पाटील, राजेश काकडे, आशुतोष , तुषार पवार, प्रतीक बेडेकर आदी सह अनेक युवक उपस्थित होते.

नगरसेवक राजू सोनी यांच्यामुळे मोठी दुर्घटना टळली

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगर पालिकेचे नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे मोठे वृक्ष रस्त्यावर पडून होणारी दुर्घटना टळली आहे. त्यांनी वेळीच अग्निशामक दलाला घटनास्थळी प्राचारण करून तो वृक्ष बाजूला काढला आहे.

पनवेल शहरातील प्रभाग क्र.१९ मधील एम.ई.सी.बी कार्यालया समोर असलेले मोठे झाड काल रात्री ८ वाजता अचानक मुख्य रत्यावर पडले. त्यामळे काही काळ रस्ता बंद झाला होता. याची माहिती नगरसेवक राजू सोनी यांना येथील काही नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी दिली.त्यांनी तत्काळ तेथे जाऊन पाहणी केली त्या ठिकाणी असलेल्या पोलिसांच्या मदतीने बॅरीगेट लावून तेथील वाहतूक थांबवली व या बाबतची माहिती नगरसेवक राजू सोनी यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख , सभागृह नेते परेश ठाकूर , तसेच महानगरपालिकेतील संबधीत अधिकाऱ्यांना कळविले . यावेळी राजू सोनी यांच्या मदतीला कोळीवाड्यातील काही मुले सुद्धा धावली कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी राजू सोनी तेथे उभेच राहून होते तसेच पनवेल महानगर पालिकेचे अग्निशमन दलाचे अधिकारी अनिल जाधव यांच्याशी संपर्क साधून त्यांना व त्यांच्या पथकाला त्याठिकाणी बोलवले व पडलेले झाड बाजूला करण्यासाठी त्यांनी त्यांच्या यंत्रणाच्या सहाय्याने ह्या झाडांच्या फांद्या कापून रस्त्याच्या बाजूला करून दिल्या.त्यानंतर महानगरपालिकेचे सफाई कर्मचाऱ्यांना बोलवून या फांद्या बाजूला करून संपूर्ण रस्त्यावर झाडून रस्ता स्वच्छ केला. व वाहतूकीस मार्ग मोकळा केला.त्यामुळे येथिल नागरिकांनी नगरसेवक राजू सोनी यांचे कौतुक व आभार मानले आहेत .

रस्त्यावरील वाहणाऱ्या गटारांवरती कायमस्वरूपी कारवाई करण्याची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

कामोठे शहरातील सेक्टर ५ ते १० मधील रस्त्यावरील गटारे भरून वाहत आहेत. स्थानिक सिडको प्रशासन तात्पुरती साफसफाई करून वेळ मारून नेते. या वाहणाऱ्या गटारांवरती कायमस्वरूपी कार्यवाही करण्याची मागणी संतोष जानू चिखलकर, उपाध्यक्ष–पनवेल जिल्हा काँग्रेस कमीटी यानी कार्यकारी अभियंता, यानी कामोठे नोड, सिडको विभाग यांच्याकडे केली आहे.

कामोठे शहर सिडकोने वसविलेले शहर आहे. मोठ्या प्रमाणात ईमारती येथे बांधन्यात आलेल्या आहेत. मात्र येथे सुविधांचा बोजवारा उडालेला आहे. वाहिन्यांमधून घाण पाणी रस्त्यावर आल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. सदर मलनिःस्सारण वाहिनीची क्षमता कमी असल्याने नेहमीच त्या तुडुंब भरलेल्या असतात. कामोठे नोड, प्लॉट नंबर १७ समोरील सेक्टर ५ मध्ये रस्तावरील गटारे भरून वाहत आहे. कामोठे शहरातील सेक्टर ५ ते १० मधील गटारे रोज कुठे ना कुठे रस्त्यावरती वाहत असतात, सिडको प्रशासन कायमची उपयोजन का करीत नाही असा प्रश्न स्थानिक नागरिकांना पडला आहे. कामोठे शहरातील बऱ्याच ठिकाणी मलनिःस्सारण वाहिन्या चॉकअप झालेल्या आहेत. तरी कामोठे शहरातील गटारांवरती नवीन झाकणे बसविणे व काही ठिकाणी दुरुस्त करून पूर्ण साफसफाई करण्याची आवश्यकता आहे. प्रशासनाने ठोस पावले उचलून या समस्या कायमस्वरूपी सोडवाव्यात असे संतोष चिखलकर यांचे म्हणणे आहे.

ग्रामीण भागात सुकलेल्या लाकडांचा कुटुंबाला आधार ; गृहीणी वळल्या सुक्या लाकडांकडे

दै.रायगड नगरी । रोहा

दरदिनी वाढणारी महागाई थांबण्याचे नावच घ्यायला तयार नाही. त्यातच दैनंदिन जिवनात स्वयंपाकासाठी लागणा–या गॅस सिलेंडरचेही दर मोठ्या प्रमाणावर वाढू लागल्याने गॅसवरचे जेवण परवडत नसल्याने गृहीणी वर्गाने आपला मोर्चा सुक्या काटक्या व लाकडे गोळा करण्यायाकडे वळविलेला दिसून येत आहे. तर शहरातील काही भागाला लागून असलेल्या जंगलामुळे सुखी लाकडे उपलब्ध होत असल्याने चुलीवरच्या जेवणाला पसंती मिळत आहे.

जंगल संपत्तीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असतानाच सरपणासाठी सुखी लाकडे गोळा करताना जंगलात फार दूरवर जावे लागत असल्याने मधल्या काळात गृहीणी वर्गाने स्वयंपाकासाठी गॅस सिलेंडरलाच पसंती दिली. त्यातच चुलीवर स्वयंपाक करणे थोडे त्रासदायक असल्याने गॅसवरील जेवण करणे सहजसोपे असल्याने गृहींनीना परवडू लागले. परंतू सद्यस्थितीत गॅसचे दिवसेंदिवस वाढते दर पाहता गृहीणींनी आपला मोर्चा आता सुक्या काटक्या व लाकडे मिळविण्याकडे वळविलेला असल्याचे दिसून येत आहे.

कळसगिरी, हनुमान टेकडी आदी डोंगर भागाला लागून असलेल्या रोहा शहरातील शिवाजीनगर, हनुमान नगर, मोरे आळी, डोंगरी मोहल्ला आदी भागाला जंगल जवळ असल्याने सुखी लाकडे गोळा करण्याकडे महिला वर्गाचा कल असतो. आदिवासी बांधवांच्या माध्यमातून सुखी लाकडं शहरी भागात उपलब्ध होत असतात.

गॅसचे दर भडकल्याने सुक्या लाकडांना अधिक पसंती मिळत असल्याने डोंगर भागात राहणारे आदिवासी बांधवांना व अन्य जमातीतील महिला व पुरूष वर्गाला या माध्यमातून चांगला रोजगार मिळत आहे. अलीकडे चुलीवर तयार होणाऱ्या जेवणा–तुन मिळणारा निराळा खमंग आणि वेगळ्या आस्वादाला वाढती पसंती मिळत आहे.

परिणामी घरातील मंडळींची चुलीवरचं जेवण बनविण्याची मागणी वाढू लागली आहे. त्यासाठी सरपणाला व सुख्या लाकडांना मागणी वाढत आहे.

पनवेलमध्ये रंगला धर्मवीर सिनेमाचा धडाकेबाज प्रीमिअर, १000 लोकांनी पाहिला मोफत शो

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल मधील आनंद दिघे युवा प्रतिष्ठान व शिवसेना पनवेल महानगर संघटक, मा. नगरसेवक ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांनी पनवेल मधील ओरियन मॉल येथे पीव्हीआर मल्टिप्लेक्स मध्ये धर्मवीर सिनेमाच्या प्रीमिअरचे व मोफत शोचे आयोजन केले होते. यावेळेस स्थानिक नागरिकांनी प्रचंड गर्दी केली. शुक्रवारी १३ मे रोजी धर्मवीर .. मुक्काम पोस्ट ठाणे हा आनंद दिघे यांच्या जीवनावरील आधारित चित्रपट संपूर्ण देशभरात प्रदर्शित झाला. याचेच औचित्य साधून प्रथमेश सोमण व त्यांच्या सहकाऱ्यांनी या चित्रपटाचा धडाकेबाज प्रीमियर आयोजित केला होता.



आनंद दिघे यांचे २५ फुटी कटआउट, ओरियन मॉल ला केलेली भगवी रोषणाई व सजावट, ढोल पथक अशा विविध वैशिष्ट्यांनी ह्या प्रीमियरचा कार्यक्रम पार पडला. ओरियन मॉलमधील पीव्हीआर मल्टिप्लेक्स मधील पूर्ण पाचही स्क्रीनवर त्यादिवशी धर्मवीर चित्रपट एकाच वेळेस दाखवण्यात आला. पनवेल मधील एक हजार नागरिकांना या शो ची मोफत तिकिटे देण्यात आली होती. या कार्यक्रमाला आमदार भरतशेठ गोगावले, जिल्हा संपर्कप्रमुख बबनदादा पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, माजी आमदार मनोहर भोईर, महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, शिवसेना नेते चंद्रशेखर सोमण इतर स्थानिक शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक व दीड हजाराहून जास्त सामान्य पनवेलकर उपस्थित होते.

यावेळेस प्रथमेश सोमण यांचा कार्य अहवाल व आनंद दिघे युवा प्रतिष्ठानची कामे व्हिडिओ स्वरूपात दाखवण्यात आली. कार्यक्रमाच्या उत्तम व रंगतदार नियोजनाबद्दल उपस्थित प्रेक्षकांनी व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी आयोजकांचे कौतुक केले. यापूर्वी ठाकरे सिनेमाचे ही असेच प्रीमियर मोफत शोचे आयोजन सोमण यांच्याकडून करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रथमेश सोमण यांच्यासह शाखाप्रमुख प्रसाद सोनवणे, अभिजीत साखरे, अर्जुन परदेशी, प्रदीप माखिजा, यतीन मानकामे, अथर्व गोखले, अभिनय सोमण, शैलेश जगनाडे, तोफीक बागवान, अक्षय जोशी, अच्युत मनोरे, महिला आघाडीच्या अर्चना कुलकर्णी प्रणाली गावडे तथा धर्मवीर आनंद दिघे युवा प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते यानि मेहनत घेतली

मुंबईतील शासकीय मुद्रणालय विभागातील सहाय्यक मानक रामचंद्र पाटील सेवानिवृत्त

दै.रायगड नगरी । कोर्लई

मुरुड तालुक्यातील वाणदे येथील सर्वसामान्य व्यक्तिमत्त्व रामचंद्र भिकू पाटील हे मुंबईच्या शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयातील मानक विभागात सहाय्यक मानक पदावर उत्तम प्रकारे सेवा करुन नुकतेच सेवानिवृत्त झाले.त्यांचा मुंबईच्या शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय द्वारा कला क्रीडा व साहित्य मंडळाने तसेच वाणदे ग्रामस्थांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.

सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबातील असलेल्या रामचंद्र पाटील हे इयत्ता सातवीत असताना वडिलांचे छत्र हरपले.हलाखिच्या परिस्थितीत न डगमगता त्यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी मुंबई गाठली! मिळेल ते काम करत रात्र शाळेत दहावी शिक्षण पूर्ण केले.याच दरम्यान शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयातील अधिकारी प्रभू देसाई त्यांना देवदूता प्रमाणे भेटले आणि त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली!

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयात सप्टेंबर १९८७ ते सप्टेंबर १९८९मध्ये मोनो कास्टिंग विभागात दोन वर्षे शिकाऊ उमेदवार नंतर दोन वर्षे हंगामी सेवा केली.दि.२५ फेब्रुवारी १९९१ रोजी मोनो कास्टिंग मशीन ऑपरेटर म्हणून सेवेत रुजू झाले.याच दरम्यान जुळणी विभाग कालबाह्य झाल्याने सन.२००१ मध्ये मानक विभागात डिपार्टर म्हणून काम केले नंतर सन.२००८ ते सन.२०११ तीन वर्षे मुद्रित शोधन विभागात काम करुन मानक विभागात सहाय्यक मानक पदावर उत्तम प्रकारे सेवा करुन नुकतेच सेवानिवृत्त झाले.

त्यांचा मुंबईतील कला क्रीडा व साहित्य मंडळातर्फे कार्याध्यक्ष प्रकाश कोरगावकर व चिटणीस नंदकिशोर मिराशी मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन तसेच वाणदे ग्रामस्थांच्यावतीने आयोजित कार्यक्रमात शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात येऊन पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी वाणदे गाव अध्यक्ष तुकाराम पाटील, सुरेश दिवेकर अशोक नाक्ती श्रीकांत वारगे प्रदिप दिवेकर लक्ष्मण वारगे तसेच मुंबई मंडळाचे प्रकाश भायदे गणपत पाटील नरेंद्र भोईर सुजित वारगे महेश दिवेकर दामोदर पाटील गोविंद भोईर ऋषिकेश बैकर व ग्रामस्थ उपस्थित होते.